# देव विश्वासणाऱ्यांना एकत्रितपणे काम करण्यास साहाय्य करतो

## मुलांना योग्य प्रकारच्या पुढारीपणा विषयी शिकवा.

मुलांसाठी पुढीलपैकी कोणताही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू एक सुसंघटीत मंडळीरूपी शरीर म्हणून एकत्रित काम करण्यास आमचे साहाय्य कर''



**नहेम्या म्हणाला, ''रणशिंगाचा शब्द जेथे ऐकू येईल तेथे तुम्ही आमच्याकडे एकत्र व्हा, आपला देव आपल्यातर्फे लढेल्''**

रणशिंगाचे चित्र काढा.

- इस्राएल लोकांचे रणशिंग म्हणजे मेंढीचे साधे पोकळ शिंग होते, हे स्पष्ट करुन सांगा.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी
- मुलांनी काढलेले चित्र मोठया माणसांना पुढच्या उपासनेच्या वेळी दाखवावे. देव सात्विक पुढाऱ्यांचा उपयोग करुन आपल्या लोकांना ऐक्याने काम करण्यास कशा प्रकारे पाचारण करतो हे ह्या चित्रवरुन दिसते असे मुलांनी स्पष्टीकरण करावे.

मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी **नहेम्या 4:1-23** मधून नहेम्याचा कथा वृत्तांत्त वाचून दाखवावा किंवा सांगावा. मुलांना लक्षपूर्वक ऐकण्यास सांगा. देवाचे गौरव मोठया इमारतीचा प्रकल्प पूर्ण करण्यास सात्विक पुढाऱ्याने आपल्या लोकांना कसे संघटित केले ते पाहा.

कथा वृत्तांत्त सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. *(मुलांना उत्तर आले नाही तरच उत्तर सांगा).*

- यरुशलेमेच्या तटबंदीविषयी इस्राएलाचे शत्रू काय म्हणाले? *(उत्तर : पाहा वचन 2)*
- नहेम्याला त्याच्या शत्रूंनी धमकी दिली तेव्हा तो मदतीसाठी कोणाकडे गेला? *(उत्तर : पाहा वचन 9)*
- देवाकडे प्रार्थना केल्यानंतर तटबंदीच्या भिंतींच्या संरक्षणासाठी नहेम्याने काय केले? *(उत्तर : पाहा वचन 13)*
- तटबंदीची भिंत बांधण्याच्या कामासाठी इस्राएल लोकांनी किती कष्ट केले? *(उत्तर : पाहा वचन 16)*
- लोक काम करीत तेव्हा नहेम्या काय करीत असे? *(उत्तर : पाहा वचन 23)*
- लोकांनी अगदी मनापासून काम करावे यासाठी नहेम्याने लोकांना कसे प्रोत्साहन दिले? *(उत्तर : नहेम्याने लोकांना प्रार्थना करयला लावली. मग त्यांच्या कामाचे त्याने नीट संयोजन केले, त्यांना देवाच्या सामर्थ्याची आठवण करुन दिली आणि कष्टाळू सेवकाचे आदर्शवत् उदाहरण समोर ठेवले.)*

नहेम्याच्या कथा वृत्तात्तांचे नहेम्या 4:1-23 मधून नाट्यीकरण करा.

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था करा. मुलांकडून तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहानांना मदत करावी.
- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात :

  **निवेदक.** कथावृत्तात्तांचा सारांश करुन मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करा.

  **नहेम्या.** एका हातात भाला आणि दुसऱ्या हातात हातोडा किंवा तत्सम काही हत्यार धरा.
- **लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात.

  **इस्राएल लोक :** वीटा आणि भाले दोन्ही हातात धरावेत.

  **शत्रू.** हातात भाले धरा.

**निवेदक :** नहेम्या 1:1 व 2 ह्या वचनातून कथावृत्तांत्ताचा पहिला भाग सांगा.

**इस्राएल लोक :** तटाच्या भिंती बांधण्याचा अभिनय करा.

**निवेदक :** ''नहेम्या आणि इस्राएल लोक यरुशलेम नगराच्या भोवती तटबंदीच्या भिंती बांधत आहेत. त्यांचे शत्रू त्यांची टर उडवून थट्टा मस्करी करीत आहेत. त्यांचे शत्रू काय म्हणतात ते ऐका.''

**शत्रू :** थट्टा मस्करी करीत हसत म्हणा. ''आता ह्या मूर्ख यहूदी लोकांनी काय बांधकाम काढले?''

''ही काय भिंत आहे?''

''ही तर नुसतीच दगडांची रास दिसत आहे!''

''एखादा कोल्हा चढला तरी भिंत पडून जाईल!''

**निवेदक :** 6-14 ह्या वचनांमधून कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''नहेम्या काय म्हणतो ते ऐका!''

**नहेम्या :** ''प्रथम आपण प्रार्थना करुन देवाकडे साहाय्य मागू या. 'प्रिय देवा, तुझ्यासाठी हे काम पूर्ण करावे याकरीता तू आमचे साहाय्य कर,' आता लोकहो शत्रूंच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष देऊ नका आपण ह्या कामाची नीट व्यवस्था लावून देवासासाठी काम करीत राहू या!''

**इस्राएल लोक :** ''आम्ही अगदी मनापसून काम करु.'' (एकमेकांशी बोला) ''तू भिंतीचे हे एवढे काम पूर्ण केलेस तर मी तिकडचे काम करतो.''

**निवेदक :** 15-23 ह्या वचनांतून कथावृत्तांत्ताचा तिसरा भाग सांगून म्हणा,'' नहेम्या काय म्हणतो ते ऐका''

**नहेम्या :** ''प्रत्येकाने आपआपले हत्यार जवळ ठेवा. रणाशिंगाचा आवाज तुमच्या कानी पडताक्षणी भिंतीचे संरक्षण करण्यास धावून या. कायम तत्पर राहा-सावध असा. आपण सर्वजण एका हातात शस्त्र घेऊन दुसया हाताने तटबंदीची भिंत बांधण्याचे काम करणार आहोत.''

**इस्राएल लोक :** ''बघा भिंत चांगली मजबूत झाली आहे!''

''आपले काम बहुतेक आता संपत आले.''

''नहेम्या किती कष्ट घेत आहे ना.''

''तो आपल्यासाठी एक चांगला आदर्श आहे.''

**निवेदक किंवा मोठे मूल :** मदत करणया प्रत्येकाचे आभार माना.

**मुलांनी हा कथावृत्तांत प्रौढांसमोर नाट्यरुपाने सादर केला असेल तर** वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.

**कविता.** चार मुलांनी स्त्रोत 2:1-2 आणि 10-11 यातून प्रत्येकी एक वचन म्हणावे.

**विचारा.** आम्ही एकत्रितपणे देवासाठी महान कार्य करावे याकरीता कोणत्या परिस्थितीत आम्हांला नहेम्यासारख्या सात्विक पुढ्यायाच्या साहाय्याची गरज असते, याची उदाहरणे सांगा. (मुलांना उदाहरणे देण्यास सांगा).

**पाठ करा** योहान 17:23

येशूसाठी एकोप्याने काम करणे या विषयावर मोठया मुलांना कविता, आणी किंवा छोटया नाटिका लिहिण्यास सांगा. हे काम त्यांना आठवडयामध्ये करता येईल.



**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, तू सर्वांचा राजा आहेस. तुझा पराभव कोणालाही करता येणार नाही. तुझ्या साहाय्याने आम्हांला आमच्या समस्यांचा सामना करता येतो आणि एकमेकांना मदत करण्याचा मार्गही सापडतो. सर्वप्रथम तुझ्याकडे साहाय्य मागण्याचे स्मरण आम्हांला सतत राहू दे. आम्ही मनापासून एकमेकांची सेवा करावी यासाठी आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net